| MHST130010422016 | नि.दि.दावा क्र.१५८/२०१६<br>सुरेश तिकुडवे वि. संतोष तिकुडवे |
|---|---|

## रे.दि.मु.क्र.१५८/२०१६ मधील निशाणी ५५ वरील आदेश

सदरहू अर्ज वादीने दाव्यातुन वादी क्र.७ व प्रतिवादी क्र. २ व ६ यांचे नाव दाव्याच्या सरनाम्यातुन कमी करुन दावा दुरुस्त करण्याची विनंती केली आहे.

२. वादी यांनी असे कथन केले आहे की, वादी क्र.७ "वैशाली महादेव तिकुडे" या दि.१९/०८/२०२४ रोजी मयत झाल्या आहेत. त्यांना कोणीही वारस नाही. प्रतिवादी क्र.२ "हिराबाई विष्णु तिकुडे" या दि.१५/०४/२०२४ रोजी मयत झाल्या आहेत. प्रतिवादी क्र. २ हिस प्रतिवादी क्र.१ व ३ हे वारस असुन ते याआधीच दाव्यात पक्षकार म्हणुन सामील आहेत. प्रतिवादी क्र.६ "लक्ष्मीबाई आनंदा तिकुडे" या दि.३०/०६/२०१७ रोजी मयत झाल्या असुन त्यांना प्रतिवादी क्र. ४ व ५ हे वारस असुन ते आधीच दाव्यात पक्षकार म्हणुन सामील आहेत. त्यामुळे, त्यांनी वादी क्र.७ व प्रतिवादी क्र. २ व ६ यांचे नाव दाव्यातुन कमी करणेस परवानगी मागितली आहे.

३. अर्ज अभिलेखाचे अवलोकन केले. युक्तीवाद ऐकला. सदरचा दावा हा सरस निरस मानाने वाटप होवुन अलग व तुटक कब्जा मिळण्याकरीता दाखल केला आहे. वादी क्र.७ "वैशाली महादेव तिकुडे" या दि.१९/०८/२०२४ रोजी मयत झाल्याबाबत मृत्युप्रमाणपत्र (नि. ५९) वर दाखल केले आहे. प्रतिवादी क्र.२ "हिराबाई विष्णु तिकुडवे" या दि.१५/०४/२०२४ रोजी मयत झाल्याबाबत मृत्युप्रमाणपत्र (नि.६०) वर दाखल केले आहे. प्रतिवादी क्र.६ "लक्ष्मीबाई आनंदा तिकुडे" या दि.३०/०६/२०१७ रोजी मयत झाल्या बाबत मृत्युप्रमाणपत्र (नि.६१) वर दाखल केले आहे. वादीने मागणी केल्याप्रमाणे वादी क्र.७ व प्रतिवादी क्र. २ व ६ यांची नावे कमी केलेवर दाव्याच्या मुळ स्वरुपात किंवा मागणीत कोणताही बदल होत नाही. त्यामुळे, सदर अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**<u>– : आ दे श :–</u>**

१) अर्ज (निशाणी ५५) मंजूर करण्यात येतो.

२) वादी क्र.७ वैशाली महादेव तिकुडे, प्रतिवादी क्र.२ हिराबाई विष्णु तिकुडे व प्रतिवादी क्र.६ लक्ष्मीबाई आनंदा तिकुडे यांचे नाव दाव्यातुन कमी करणेत यावे.

३) वादीने अर्जात नमूद केल्याप्रमाणे प्रस्तावित दुरूस्ती करुन दाव्याची दुरुस्तप्रत दाखल करावी.

पाटण. ( आर.एम.लोळगे )

दि. १५/०९/२०२५. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पाटण.